## रे. दिवाणी मुकदमा नं. १७८/२०१५ मधील नि.२४ वरील आदेश
## (हिंदुराव पांडूरंग पाटील वि. जगन्नाथ पाटील व.)

१. वादी यांनी याकामी उप अधिक्षक भुमि अभिलेख, वाळवा इस्लामपूर यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुकती करणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

२. वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

वादी यांनी प्रतिवादींविरुध्द अतिक्रमीत केलेल्या क्षेत्राचा कब्जा मिळणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला असून वादी यांनी उप अधिक्षक भुमि अभिलेख, वाळवा इस्लामपूर यांच्यामार्फत रितसर दिनांक २१/०३/२०१७ रोजी दावा मिळकतीची मोजणी केली आहे. सदर मोजणीअंती प्रतिवादींनी मोजणी नकाशात दाखविल्याप्रमाणे ११ आर चे अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झालेले आहे. अशी परिस्थिती असतानाही याकामी प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत मांडलेली नाही. मुळ मोजणी २००७ मध्ये झाल्यानंर प्रतिवादींनी त्यांच्या गट नं. ३०९९ ची मोजणी करुन घेतो असे सांगितले होते. मात्र आजतागायत त्यांनी अशी कोणतीही मोजणी केलेली नाही. सबब वादींनी हा अर्ज दाखल केला असून उप अधिक्षक भुमि अभिलेख, वाळवा इस्लामपूर यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती होवून गट नं.३०९८ ची मोजणी झाली असता अतिक्रमणाची बाब रेकॉर्डवर येण्यास मदत होणार आहे. सबब त्यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. याकामी प्रतिवादी यांना संधी देवूनही त्यांनी त्यांचे म्हणणे याकामी दाखल केलेले नाही. सबब त्यांच्याविरुध्द 'म्हणणे नाही' असा आदेश पारीत करण्यात आला आहे. एकंदरीत याकामी दाव्याचे स्वरुप पाहता गट नं.३०९८ क्षेत्र १ हेक्टर ५२ आर, पोट खराब ०.०६ आर ही वादीची मिळकत असून गट नं.३०९९ ही प्रतिवादीची मिळकत आहे. वादीच्या म्हणण्यानुसार

प्रतिवादी यांनी वेळोवेळी दावा 'अ' मिळकतीमध्ये अतिक्रमण केले आहे व सदरचे अतिक्रमण हे दिनांक २१/०३/२००७ रोजी उप अधिक्षक भुमि अभिलेख, वाळवा इस्लामपूर यांच्या मोजणीमध्ये निश्चित झालेले आहे. सबब त्यांनी याकामी प्रतिवादी यांनी वादीच्या दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींनी बसविलेले दोन पाण्याचे चेंबर्स काढून घेण्याबाबत मॅण्डेटरी ताकीद व कब्जा मिळणेसाठी हा दावा दाखल केला आहे. याकामी यातील वादी यांनी नि.४/३ सोबत उप अधिक्षक भुमि अभिलेख, वाळवा इस्लामपूर यांचा कासेगाव येथील गट नं.३०९८ चा मोजणी नकाशा देखील दाखल केला आहे. मात्र या आधीच वादींनी कथन केल्याप्रमाणे त्यांनी केवळ गट नं.३०९८ या गटाची मोजणी केलेली आहे. मात्र दोन वादादीत गटांची मोजणी झाल्याशिवाय अतिक्रमणाची बाब शाबीत होत नाही. याकामी अतिक्रमणासंबंधी दावा असल्या कारणाने याकामी उप अधिक्षक भुमि अभिलेख, वाळवा इस्लामपूर यांच्या मार्फत जर वादादीत मिळकतीची मोजणी झाली तर अतिक्रमणाची बाब समोर येण्यास मदतच होणार आहे. सबब याकामी वादी यांनी त्यांच्या गटाची मोजणी होवून मिळणेसाठी अर्ज केला आहे. मात्र वर कथन केल्याप्रमाणे दोन्ही गटाची एकत्रीत मोजणी केल्याशिवाय अतिक्रमणाची बाब समोर येत नाही. सबब याकामी वादींचा गट नं.३०९८ बरोबरच प्रतिवादींच्या गट नं.३०९९ ची एकत्रीत मोजणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज अशंतः मंजूर करणे गरजेचे वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | वादींचा नि.२४ चा अर्ज अशंतः मंजूर करण्यात येतो. |
| २. | उप अधिक्षक, भुमि अभिलेख, वाळवा–इस्लामपूर ता.वाळवा यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्यात येते. |

| | |
|---|---|
| ३. | कोर्ट कमिशनर यांना असा आदेश पारीत करण्यात येतो की, त्यांनी उभयपक्षांसमक्ष, मौजे कासेगाव, ता.वाळवा येथील गट नं.३०९८ व गट नं.३०९९ यांची चतुःसिमापुर्वक मोजणी करुन, अतिक्रमणाची बाब नकाशासमध्ये नोंद करुन, मोजणी नकाशा व अहवाल पुढील तारखेपर्यंत मे. कोर्टासमोर दाखल करावा. |
| ४. | मोजणीसाठीची सर्व फी वादींनी संबंधित कार्यालयात भरावी. |
| ५. | संबंधीत कार्यालयात फी जमा केल्यानंतर कमिशन प्रपत्र जारी करण्यात येईल. |

**इस्लामपूर.** **(सौ. एस. सी. पाटील–मेटील)**

**दिनांक –१९/१२/२०१७.** **चौथे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इस्लामपूर.**